महाराष्ट्र राज्य मंडळ माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण
मंडळ पुणे विभागीय मंडळ,
पुणे ४११००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY &
HIGHER SECONDARY EDUCATION, PUNE
DIVISIONAL BOARD, PUNE- 411005

| DIVISIONAL CHAIRMAN | DIVISIONAL SECRETARY | E-MAIL sscboardpune@gmail.com |
|---|---|---|
| 25536722 (OFF) | 25536781 / 82 / 83<br>25536712 (OFF) | |


क्रमांक:पुविमं/उ.मा.ब/गोपनीय/१००७
पुणे:- ४११ ००५
दि.३१/०८/२०२६

प्रति,

सर्व प्राचार्य,

पुणे,अहिल्यानगर व सोलापूर जिल्हा

**विषय:-** उच्च माध्यमिक प्रमाणत्र परीक्षा फेब्रु/मार्च २०२७ चे शिक्षक पॅनेल अद्ययावत करणे बाबत...

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ. १२वी) फेब्रु/मार्च-२०२७ शिक्षक पॅनेल अद्ययावत करण्याकरीता मंडळ कार्यालयाने जिल्हा निहाय नव्याने इ-मेल आयडी तयार केले असून. ते खालील **तक्ता 'अ'** मध्ये दर्शविण्यात आले आहेत.

**तक्ता 'अ'**

| अनु.क्र | जिल्हा | ई-मेल आडी |
|---|---|---|
| ०१ | पुणे | hscpune1@gmail.com |
| ०२ | अहिल्यानगर | hscahilyanagar@gmail.com |
| ०३ | सोलापुर | hscsolapur@gmail.com |

## फेब्रु/मार्च-२०२७ शिक्षक पॅनेल अद्ययावत करण्याकरीता महत्वाच्या सुचना

1. कार्यालयाने सोबत दिलेल्या एक्सेल शीट मध्ये आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात शिकवत असलेल्या सर्व विषयासह सर्व विषय शिक्षकांची माहिती भरणे आवश्यक आहे.
2. संपुर्ण माहिती भरून झाल्यानंतर त्याची प्रिंट काढून त्यावर संबंधित शिक्षकांची स्वाक्षरी व प्राचार्यांचा सही शिक्का असणे बंधनकारक आहे.
3. कनिष्ठ माहाविद्यालयात एकूण किती शिक्षक आहेत याची माहिती संच मान्यता विद्यार्थी संख्येप्रमाणे असणे आवश्यक आहे.तसेच प्रोफाईल मध्ये भरलेली माहिती देखील अचुक असणे आवश्यक आहे. त्यामध्ये काही तफावत आढळल्यास मंडळ नियमा नुसार योग्य ती कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.
4. एखादा शिक्षक एकापेक्षा अधिक विषय शिकवत असल्यास त्यांची शिकवत असलेल्या सर्व विषयांची माहिती भरणे आवश्यक आहे. तथापि संबंधित शिक्षकास कोणत्या विषयाच्या उत्तरपत्रिका तपासणीसाठी आवश्यक आहे त्या विषयाचा विषय कोड व माध्यम एक्सेल शीट मधील रकाना क्र. ८ मध्ये नोंद करणे आवश्यक आहे.
5. कनिष्ठ महाविद्यालयात कार्यरत असलेल्या सर्व कर्मचाऱ्यांचे सन २०२६-२७ चे हजेरी पत्रक प्राचार्यांनी प्रमाणित करून त्याची छायाप्रत अपलोड करने बंधनकारक आहे.
6. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी नियुक्त करण्यात आलेल्या कोणत्याही शिक्षकास मंडळाचे उत्तरपत्रिका तपासणीचे काम पुर्ण झाल्याशिवाय कार्यमुक्त करण्यात येवू नये, असे आढळून आल्यास आपणा विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.
7. सोबत दिलेले हमीपत्र भरुन त्यावर संस्था सचिव व प्राचार्य यांच्या सही शिक्क्यासह प्रमाणित करणे बंधनकारक आहे.

Scanned with OKEN Scanner

8. अ. संपुर्ण शिक्षक माहिती भरलेले पॅनलची एक्सेल शीट
   ब. एक्सेल शीटची सही शिक्कयासह प्रमाणित केलेली PDF.
   क. संच मान्यता PDF
   ड. कनिष्ठ महाविद्यालय कार्यरत असलेल्या सर्व शिक्षक/कर्मचाऱ्यांच्या माहे जुलै व ऑगस्ट २०२६ चे हजेरीपत्रकाची प्राचार्य यांनी प्रमाणीत केलेली छायाप्रत.
   इ. संस्था सचिव व प्राचार्य यांचे सही शिक्का असलेले हमीपत्र व अ,ब,क,ड PDF एकत्रित आपल्याला दिलेल्या उपरोक्त नमुद केलेल्या ई-मेल वर पाठविण्यात यावी.

9. सदर शिक्षक माहिती सर्व कनिष्ठ महाविद्यालयांनी दि.२०/०९/२०२६ पर्यंत दिलेल्या ई-मेल आयडी वर पाठवावी.

10. दि.२०/०९/२०२६ पर्यंत सदर माहिती न भरल्यास इ १२ वी बोर्ड परीक्षेचे प्रवेशपत्र प्राप्त होणार नाही, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

11. सदर माहिती कशी भरावी या बाबतचा व्हिडीओ https://www.youtube.com/watch?v=HEG1XZA_Eao या लिंक उपलब्ध करण्यात आला आहे.

माहिती वेळेत सादर न केल्यास, तसेच विद्यार्थ्यांना प्रवेशपत्र प्राप्त न झाल्यास त्यास सर्वस्वी आपण जबाबदार राहाल, याची नोंद घ्यावी.

नविन सांकेतांक प्राप्त झालेल्या कनिष्ठ महाविद्यालयांनी उपरोक्त नमूद करण्यात आलेल्या अ,ब,क,ड व इ नुसार शिक्षक माहिती व इतर सर्व तक्ते प्राचार्यांच्या सही शिक्कयासह प्रमाणित प्रत कार्यालयाकडे त्वरित जमा करावी.

MBRaut

(डॉ. मिनाक्षी राऊत)
विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ,
पुणे- ४११ ००५

Scanned with OKEN Scanner

# संयुक्त हमीपत्र

दिनांक : __ / __ / __

शाळा / कनिष्ठ महाविद्यालय सं. क्र. : S/J- __.__.__

**प्रति,**

मा. विभागीय सचिव,

पुणे विभागीय मंडळ, पुणे—05.

**विषय:- माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा, फेब्रुवारी—मार्च,२०२७ च्या परीक्षापूर्व, परीक्षा कालावधीतील व परीक्षोत्तर कामकाजाची जबाबदारी स्विकारण्याबाबत संयुक्त हमीपत्र.**

माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा, फेब्रुवारी—मार्च,२०२७ च्या अनुषंगाने मंडळाकडून प्राप्त होणाऱ्या आदेश, सूचना, नियम व वेळापत्रकानुसार परीक्षापूर्व, परीक्षा कालावधीतील तसेच परीक्षोत्तर सर्व कामकाज जबाबदारीने व विहित मुदतीत पूर्ण करून घेण्याबाबत आम्ही मुख्याध्यापक/प्राचार्य व संस्था सचिव या नात्याने खालीलप्रमाणे संयुक्त हमी देत आहोत.

1. आमच्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयास मंडळाची मान्यता असून, मंडळाच्या परीक्षेसंबंधी लागू असलेल्या सर्व अटी व शर्ती आम्हास ज्ञात आहेत. मंडळ मान्यतेनुसार ज्या विषयांसाठी विद्यार्थी प्रविष्ट झाले आहेत, त्या सर्व विषयांचा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी विहित नियमांनुसार पात्र, संबंधित व कार्यक्षम शिक्षक उपलब्ध ठेवण्यात येतील. त्या विषयाच्या सर्व शिक्षकांकडून मंडळाच्या निर्देशानुसार प्रात्यक्षिक परीक्षा, लेखी परीक्षा, उत्तरपत्रिका मूल्यांकन व परीक्षापूर्व, परीक्षा कालावधीतील तसेच परीक्षोत्तर कामे प्राधान्याने करून घेण्यात येतील.
2. संबंधित शिक्षकांकडून प्रात्यक्षिक व लेखी परीक्षेचे काम, उत्तरपत्रिका तपासणी/मूल्यांकनाचे काम करून घेणे, शाळा/कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर उत्तरपत्रिका मूल्यांकनासाठी आवश्यक वेळ व सुविधा उपलब्ध करून देणे तसेच मंडळाकडून वेळोवेळी प्राप्त आदेशानुसार संबंधित शिक्षकांना मंडळाकडे पाठविणे, ही जबाबदारी मुख्याध्यापक/प्राचार्य व संस्था सचिव यांची राहील.
3. मंडळाने नियोजित केलेल्या प्रात्यक्षिक परीक्षेच्या वेळापत्रकानुसार प्रात्यक्षिक, लेखी परीक्षा व संबंधित निकालाचे कामकाज पूर्ण होईपर्यंत परीक्षेच्या कामावर परिणाम होईल अशा प्रकारे कोणत्याही संबंधित शिक्षकाची दीर्घ रजा मंजूर केली जाणार नाही. अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर तात्पुरत्या नियुक्त केलेल्या शिक्षकांना शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातून परीक्षेची कामे संपेपर्यंत कार्यमुक्त केले जाणार नाही. तसेच उत्तरपत्रिका तपासणीच्या कामातून सूट मिळण्यासाठी शिक्षकांकडून प्राप्त होणाऱ्या विनंती अर्जांची मंडळाकडे शिफारस केली जाणार नाही.
4. आमच्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील मान्यताप्राप्त विषयांच्या सर्व संबंधित शिक्षकांची माहिती मंडळाच्या पोर्टलवर/विहित नमुन्यात सादर करण्यात येईल व कोणत्याही शिक्षकाचे नाव जाणूनबुजून अथवा अनवधानाने वगळले जाणार नाही. सदर माहितीमध्ये त्रुटी, अपूर्णता अथवा विसंगती आढळल्यास त्याची जबाबदारी आम्ही स्वीकारू व मंडळाच्या सूचनेनुसार तात्काळ कार्यवाही करू.
5. मंडळाकडून पोस्टाद्वारे अथवा अधिकृत प्रतिनिधीद्वारे प्राप्त होणाऱ्या उत्तरपत्रिकांच्या बंडल/पार्सलची कोणतीही कारणे अथवा प्रश्न निर्माण न करता स्विकृती घेण्यात येईल. प्राप्त झालेले उत्तरपत्रिकांचे बंडल कोणत्याही परिस्थितीत स्वतःहून मंडळाकडे परत पाठविले जाणार नाही. चुकीचे अथवा चुकीच्या पत्त्यामुळे बंडल प्राप्त झाल्यास तात्काळ मंडळाशी संपर्क साधून मंडळाकडून प्राप्त सूचनेनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

वरील अटी व सूचनांनुसार कार्यवाही न केल्यामुळे परीक्षा, उत्तरपत्रिका तपासणी अथवा संबंधित कामकाजात दिरंगाई, हलगर्जीपणा किंवा कसूर झाल्यास, लागू शासन नियम, मंडळाची नियमावली व म.ना.से.सेवाशर्तीनुसार सक्षम प्राधिकरणाकडून करण्यात येणारी कारवाई आम्हास मान्य राहील व त्याबाबत आमची कोणतीही हरकत राहणार नाही.

वरीलप्रमाणे परीक्षापूर्व, परीक्षा कालावधीतील व परीक्षोत्तर सर्व कामकाज मंडळाच्या आदेशानुसार, नियमानुसार व विहित मुदतीत पूर्ण करून घेण्याची संयुक्त हमी आम्ही देत आहोत.

| **मुख्याध्यापक / प्राचार्य** | **संस्था सचिव** |
|---|---|
| मुख्याध्यापक / प्राचार्य यांचे नाव : | संस्था सचिव यांचे नाव : |
| स्वाक्षरी : ___________ | स्वाक्षरी : ___________ |
| शिक्का : _____________ | शिक्का : _____________ |

Scanned with OKEN Scanner